MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



## आदर्श आवरगाव च्या आदर्श निर्णयाचे सर्वत्र कौतुक गुटक्याची केली सार्वजनीक ठिकाणी होळी

किल्लेधारूर (रोहित फावडे)

तालुक्यातील आदर्श गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आवरगाव या ठिकाणी दारू व गुटखाबंदीचा आदर्श निर्णय आवरगाव- हसनाबाद ग्रामपंचायतीचे आदर्श सरपंच .अमोल सर्जेराव जगताप यांच्या मार्गदर्शना खाली गावातील नागरिकांनी गावातील सर्व दुकानातील टपरी वरील गुटखा गोळा करून त्याची होळी करण्यात आली आहे. प्रभावी पणे या निर्णयाची अमलबंजावनी करण्याचे यावेळी एकमताने ग्रामस्थानी ठरवले आहे अधिक माहिती अशी की धारूर तालुक्यातील आदर्श असणाऱ्या आवरगाव येथील युवा पिढी व्यसना पासून दूर राहावी यासाठी आदर्श आवरगाव- हसनाबाद येथील सरपंच अमोल सर्जेराव जगताप यांच्या मार्गदर्शना खाली गावातील नागरिकांनी गावात टपरी व किराणा दुकानात विकला जाणारा गुटखा एकत्रित गोळा करून त्या गुटख्याची ग्रामपंचायत कार्यालया समोर गावातील नागरिकांच्या समोर त्याची होळी करण्यात आली व गावातील किराणा दुकानदार व टपरी चालक यांना यापुढे गुटखा विक्री केल्यास आर्थिक दंड सोसावा लागेल अशी सक्त ताकीत देण्यात आली.यावेळी गावातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती व या गुटखाबंदी च्या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या वेळी सरपंच अमोल जगताप, सुरेंद्र नखाते अक्षय जगताप, विकास ओव्हाळ, अशोक नखाते, अविनाश जगताप सह ग्रामस्थ यावेळी उपस्थीतं होते

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३०९ | गुरूवार दि.०१ ऑगस्ट २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -309 | THURSDAY DT.01 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# शिंक्याचें तुटलें की बोक्याचे साधते

## पेठ बीड पोलीस ठाण्याच्या अंतर्गत वाढत असलेले गुन्हे पोलिसांसाठी पर्वणीच असल्याची चर्चा

## पेठ बीडचा पुरता बिहार तरीही हनुमंत उगले केवळ वसुली करण्यात पटाईत! उगलेचा दरारा कि आणखी काही?

बीड प्रतिनिधी- बीड बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मुख्य पाहता गांधीनगर तेलगाव नाका बार्शी नाका या परिसरामध्ये अक्षरशः दोन नंबर वाल्यांनी माफी यांनी नंगानात चालू केलेला आहे यामध्ये हाणामाऱ्याच्या घटना असतील खून दरोडा चोऱ्या सह देशी-विदेशी दारू अवैध ताडी शिंदे विक्री पत्त्याचे क्लब बुटक्याचे अंडे मटका पत्त्याचे क्लबसह अनेक दोन नंबरचे धंदे हे हनुमंत उगले च्या बीडमध्ये घडत असताना पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मंदिराज यांनी मात्र हनुमंत उघडलेला पाठीशी घालण्यासाठी संबंधित भेट दिलेली आहे का एवढे मोठे प्रकरण होऊन सुद्धा हनुमंत उगले हा वसुली करत आहे त्यामुळे पोलिसांमध्ये तनवाचे वातावरण निर्माण झाले आहे पोलीस स्टेशन च्या हद्दीत बिहार सारख्या परिस्थितीला जनता डोळे उघड्या डोळ्यांनी पाहत आहे म्हणजे विहार झाले आहे का असावा पोलीस अधीक्षक यांना बीडची जनता विचारत आहे.







## चार गुन्हे दाखल, तरीही कारवाई नाही उपोषणाचा हिराबाई कांबळे यांचा इशारा

बीड : शहरातील पूरग्रस्त कॉलनी भागातील हिराबाई दीपक कांबळे यांना शेजारीच राहणारे कीर्ती सुंदर शिंदे, सुंदर मच्छिंद्र शिंदे, हेमंत सुंदर शिंदे, सागर सुंदर शिंदे, छायाबाई सुंदर शिंदे, अंजली सुंदर शिंदे, गुट्टी सुंदर शिंदे यांनी वारंवार मारहाण करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. याप्रकरणी या आरोपींविरोधात चार वेगवेगळे गुन्हे दाखल झाले. तरीही पोलिसांकडून काहीच कारवाई झालेली नाही. पोलिसांकडून त्यांना पाठीशी घातले जात असल्याने या आरोपींनी घरात घुसून हल्ला केल्याचा आरोप केला. - त्यामुळे पाठीशी घालणारे पेठबीडचे पोलिस निरीक्षक अशोक मुदिराज, फौजदार रमेश उबाळे उबाळे, यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी हिराबाई कांबळे यांनी बुधवारी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## बीड एलसीबीने कारवाई करण्याची जनतेची मागणी.

पीआय शेख उस्मान साहेबांकडून कारवाईची अपेक्षा.

पेठ बी पोलीस ठाणे हद्दीत माफी यांचा नंगानात झालेला आहे हा नंगानाच करून माफी यांच्या नांग्या ठेवण्यासाठी बीड पोलीस दलातील एलसीबी शाखेने कारवाई करण्याची मागणी यावेळी होत आहे यावेळी यांची उस्मान साहेब यांच्याकडून संबंधित कारवाईसाठी शहरातील जनतेला अपेक्षा आहे तर पेड बीडचा बिहार झाल्यामुळे संबंधित कारवाई एडमिट पोलिस स्टेशन करत नाही तर माफियाना पाठीशी घालण्यामध्ये पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी हनुमान उगले गांधीनगर बीडमध्ये जाऊन पाहिले तर अक्षरशः बिहारची आठवण होते या ठिकाणी अनेक माफी यांची दादागिरी व खुल्या दोन नंबरचे धंदे कसे चालतात हे गांधीनगर तेलगाव नाका बार्शी नाका परिसरात भेटातीमध्ये दिसून येईल त्यामुळे कारवाई करावी अशी मागणी यावेळी बीडच्या जनतेतून होत आहे

## पेठ बीड आहे का बिहार.? अशोक मुदिराच्या कार्यकाळात गांधीनगर बार्शी नाका सर्वात महत्त्वाच्या माफियाच्या संपर्कात पेठ बीड पोलीस?

बीड (प्रतिनिधी)

पोलीस ठाण्याच्या हद्दीत नंदकुमार ठाकूर साहेब अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे यांनी स्वतः फिरून पहावे पेठ बीड चा बिहार झालाय का नाही दिसून येईल? गांधीनगर ची बीट अमलदार हनुमंत उगले अनेक काळे धंदे उगले च्या बीटमध्ये जोराने चालू? एखाद्या चित्रपटाला शोभेल अशी परिस्थिती पेठ बीड मधील जनतेत तणाव पोलिसांचे धागेदोरे गुन्हेगार माफीयांशी लहान मुलाचा निर्घृण खून आईने केला का दुसरा कोणी कोणी पडद्या मागे आहे का पेठ बीड ठाण्यातील हद्दीमध्ये येणाऱ्या महत्त्वाच्या बीटसह विशेष माफियांकडून वसुलीची जबाबदारी पि आय मुदिराज च्या अत्यंत विश्वासू माणसाजवळ? बीट कुणाचीही असो पीआय अशोक मंदिराचे विश्वासू कर्मचारी सर्व पीठ मधून करतात माया जमा?

अनेकांची बीट आम्हाला नको म्हणून पिया इकडे तक्रार कारण ड्युटी आम्ही करायची आणि वसुली दुसऱ्यांनी करायची असं कसं चालणार मुदिराज साहेब म्हणून पेठ बीड ठाण्याचे कर्मचारी करू लागले आपापसात चर्चा. ?येणाऱ्या विधानसभा नगरपालिका निवडणुकीत बीड शहरामध्ये तणावाचं वातावरण बीड बीड मध्ये सर्वात जास्त गुन्हेगार राजकीय नेते यांची पेड बीडमध्ये दहशत?

गुन्हेगारांना पाठीशी पेठ बीड पोलीस ठाण्यातील पीआय अशोक मुदिराज यांच्या मर्जीतील पोलीस कर्मचारी? सर्वात जास्त पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारांची दहशत कायम? पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत अनेक गुन्हे प्रलंबित? विशेष पाहता पेठ बीड ठाणे हद्दीत सर्वात महत्त्वाची बीट पि आय अशोक मुदिरात यांच्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना? पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतून अनेक अवैद्य ताडी शिंदी ची विक्री दारूच्या गाड्या वाळू गुटखा सह वेगवेगळे माफी यांचे वाहने राज रोष पणे छाती ठोकून चालू आहेत का नाहीत? पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये अनेक शाळा कॉलेज नामांकित विद्यालय महाविद्यालय दहशतीखाली?

पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये सामूहिक बलात्काराच्या घटना? पेठ बीड पोलीस ठाण्यात नेतेमंडळीच्या हस्तक्षेपामुळे आणि वैयक्तिक मतभेदामुळे अनेक तक्रारीमध्ये प्रकरण सोडून दिली जात आहेत? पोलीस ठाण्यामध्ये एखादा व्यक्ती तक्रार घेऊन आला तर संबंधित बिटअमदारला विचारल्याशिवाय त्या ठिकाणची तक्रार नोंदवून घेत नाहीत? माफिया राजकीय नेते यांच्याकडून पोलीस प्रशासनाला अनेकदा फोन कोणाची तक्रार घ्यायची कोणाची नाही व काय तक्रार घ्यायची हा माफिया राजकीय नेते मंडळी ठरवू लागले पेठ बीड पोलीस ठाण्यातील गुन्हा दाखल संदर्भात?

- एस पी नंदकुमार ठाकूर यांच्यापुढे पेठ बीड चा बिहार झाल्यामुळे माफीयांच्या विरोधात बीड एलसीबी कडून कारवाईची मागणी बीड बीडच्या नागरिकांकडून.
गंगाजल पिक्चर पाहिला तर पेड बीड हद्दीची परिस्थिती बिहार सारखीच झाली का नागरिकात चर्चा?
सामूहिक लैंगिक अत्याचाराची एवढी मोठी घटना होत असताना पण पेट बीड पोलीस ठाण्याच्या कर्मचारी हनुमंत उगले गांधीनगर मध्ये दहशत माजू लागला?
- हनुमंत उगलेनी गंगाजल पिक्चर मधल्या स्टाईल प्रमाणे वसुली व दहशत संबंधित मध्ये माजवली आहे राजरोसपणे माफी यांचा नंगानाच?
पेठ बीड पोलीस ठाण्यात फिर्यादी महिलेला न्याय न मिळाल्याने उपोषणाचा महिलेने घेतला निर्णय?
लहान मुलाचा खून याच पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाला?
- आईला आरोपी करून पोलीस मोकळे झाले फिर्यादी पेड बीड पोलीसच का होतात?
वाळू मुरूम खडी दगड याचे वाहने राजरोसपणे माफी यांचा नंगानाच?
मोठ्या सामाजिक तेढ निर्माण होण्याची दाट शक्यता?
पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतून बीड जिल्ह्याच्या अनेक भागातून महत्त्वाच्या दोन नंबर माफियांचा वावर?
बनावट ताडी शिंदी सह देशी विदेशी दारू बनविणे पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात माफीया सक्रिय?
- महिला मुलींवर हल्ले पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकूण किती गुन्हे घडले बीड शहरातील पोलिस स्टेशन इतर पेक्षा सर्वात जास्त गुन्हे पेठ बीड पोलीस स्टेशनच्या हद्दीत!
हॉटेल दुकानाची तोडफोडेच्या अनेक घटना?
- राजकीय द्वेष्यातून झालेले अनेक भांडण पोलिसांनी गोरगरिबाला त्रास दिला?

- पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अनेक गंभीर गुन्हे दाखल?
बीडचा बिहार पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालाय का?
खून हाणामाऱ्या गँगवॉर सारख्या अनेक घटना बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्या आहेत का?
हातभट्टी दारूची पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठाल्या दारू माफी यांच्या अड्डे आहेत का
- दारू पत्त्याच्या क्लब अवैध ताडी शिंदे मटका भूमापिया वाळू मुरुड सह गुटखा माफियांचा बालेकिल्ला पेठ बीड पोलीस ठाणे आहे का?
देशी दारू विदेशी दारू चा महापूर पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये जोरदार वाहत आहे?
अवैधरित्या केमिकल द्वारे बनवलेली सिंधी ताडी पेठ बीड पोलीस स्टेशनच्या हद्दीत खुलेआम विक्री?
पत्त्याचे क्लब पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दहा ते बारा जागी चालू?
- गांधीनगरची बीट हनुमंत उगले कडेच का पीआय अशोक मुदिराच्या उत्तर द्यावे?
पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत आणि अनेक चोर रहिवासी आहेत का नाही?
पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाळू माफिया चा नंगानाच?
पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुरुम माफी यांचा नंगानाच?
पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत खुलेआम दहशत माजवून मीच या एरियाचा दादा म्हणून फिरणारे डॉन या भागात आहेत का नाहीत?
- पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गोहत्या होत आहे का नाही?
पेठ बीड ठाण्याच्या हद्दीत अनेक चोऱ्यांच्या घटना घडल्या आहेत का नाहीत?
पेठ बीड हद्दीत रामतीर्थ एमआयडीसी हनुमान नगर पूरग्रस्त कॉलनी खंडेश्वरी परिसर गांधीनगर मोमीनपुरा इस्लामपुरा तेलगाव नाका बार्शी नाका गायरान प्रकाश आंबेडकर नगर सह अनेक भागांमध्ये कित्येक भांडण तंटाच्या केसेस सर्वाधिक पेठ बीड पोलीस स्टेशनच्या हद्दीत?

- पेठ बीड पोलीस स्टेशनच्या हद्दीत जातीय तेढ निर्माण होण्यासारख्या घटना घडण्याची दाट शक्यता?
सावकारकी व्याजाने पैसे देणारे पोलीस ठाणे पेड बीडच्या हद्दीत?
वसुलीसाठी तगादा लावणारे अनेक गुन्हेगार पेड बीड पोलीस स्टेशनच्या हद्दीत?
पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक गुन्हेगार रहिवासी आहेत या गुन्हेगारांची दहशत म्हणजे फिर्यादीला पोलीस स्टेशन पर्यंत सुद्धा जाऊन देत नाहीत?
- पेठ बीड पोलीस ठाणे अंतर्गत अनेक पोलीस अधिकारी कर्मचारी यांचा धबधबा व आर्थिक तडजोडी साठी जीवाची चलबिचल?
पेठ बीड पोलीस ठाण्याच्या अनेक बिटामलदारांचे संपर्क माफीयांशी?
भू माफिया पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये सक्रिय?
पेबीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अनेक ठिकाणी दुसऱ्यांच्या जागेवर कब्जा करणे ताबा मारणे कुठल्या गुन्हेगारी क्षेत्राला बळ देणाऱ्या पेड बीड पोलिसांना गुन्हेगारांचे आव्हान?
- पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत अनेक ठिकाणी दहशत माजविणे गुन्हेगारांकडून जनतेला भयभीत करण्याचा प्रयत्न चालूच?
राजकीय वरदहस्त लाभलेले पेठ बीड पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी?
गुन्हेगारांचे गुन्हे झाकून ठेवून आर्थिक तडजोडी मध्ये गुंतलेले अनेक पोलीस कर्मचारी?
- राजकीय वर्धास्त लाभलेले अनेक गुन्हेगार पेड बीड पोलिसांच्या समोरून जातात तरी पोलीस नमस्कार करून निघून जातात?
व्याजाने पैसे देणे लोकांना अरेरावी करत महिला ना मारहाण व्याजाचे पैसे वसूल करण्यामध्ये अनेक पोलीस कर्मचारी गुन्हेगार सावकारांच्या पाठीशी?

# ओबीसीचे आरक्षण धोक्यात, वेळीच सावध होण्याची गरज - प्रकाश आंबेडकर

## प्रत्येक जातीचे नेते समाजाची ताकद दाखवता पण तुमची राजकीय ताकद कुठे आहे?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : आज काल ओबीसी समाज जागा झाल्यासारखे दृश्य दिसत आहे . मात्र प्रत्येक ठिकाणी आपापल्या जातीचे, समाजाचे मेळावे, अधिवेशने, आंदोलने मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहेत परंतु याचेही पुढे जाऊन सर्व समाजातील लोकांनी ओबीसी म्हणून एकत्र येऊन सरकारला धडकी भरवली पाहिजे तरच सरकार नीट होईल . अन्यथा आपले आरक्षण धोक्यात आलेच आहे .वेळीच सावध होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ड . बाळासाहेब आंबेडकर यांनी गेवराई येथे केले . आरक्षण बचाव रॅली ही गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रभर जात असून अंबाजोगाई नंतर बुधवार दिनांक ३१ जुलै रोजी गेवराईतील शास्त्री चौकात सायंकाळी ड . प्रकाश आंबेडकर यांचे रॅलीचे भव्य स्वागत करण्यात आले . हजारो ओबीसी बांधवांच्या उपस्थितीत प्रकाश आंबेडकर यांनी महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून आपल्या भाषणाला सुरुवात केली . त्यांनी म्हटले न्यायालयात सामाजिक निर्णय उशिरा लागतात .त्यामुळे सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी आपल्यालाच एकत्र यावे लागेल . या रॅलीचा समारोप ७ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी होत आहे. आपल्या घरचे लग्न समजून सर्व ओबीसी बांधवांनी आपापल्या पद्धतीने छत्रपती संभाजीनगर येथे रॅलीच्या समारोपास यावे . ७ ऑगस्ट हा ओबीसीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा दिवस असून या दिवशी तत्कालीन पंतप्रधान व्ही . पी . सिंग यांनी मंडळ आयोग जाहीर केला होता . म्हणून ७ ऑगस्ट रोजी मंडल दिन आपण देशभर साजरा करावा . यासाठीच रॅलीचा समारोप छत्रपती संभाजीनगर येथे ठेवण्यात आला आहे . पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की राज्यात मणिपूरसारखी स्थिती होवू शकते असे म्हणून शरद पवारांना दंगल घडवायची आहे का ? असा सवाल केला. प्रत्येक जातीचे नेते समाजाची ताकद दाखवता पण तुमची राजकीय ताकद कुठे आहे?




ओबीसी आरक्षण बचाव यात्रेच्या व्यासपीठावरून बाळासाहेब आंबेडकरांनी खडा सवाल केला . ओबीसी समाजाचे नेते आपआपल्या समाजाची ताकद दाखवतात आणि स्वतःचे महत्व वाढवून घेतात. मात्र ओबीसी म्हणून कुठंय एकजूट तुमची . राजकीय ताकद कुठे आहे ? असा खडा सवाल वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी येथे बोलताना उपस्थित केला .शरद पवारांना ओबीसी-मराठा आरक्षण वाद पेटता ठेवून निवडणुक लढवायची आहे. मणिपूरचा विषय त्यांनी मुद्दाम काढला. याचा अर्थ त्यांनाच महाराष्ट्रात दंगल घडवायची आहे का ? कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि उद्धव ठाकरे यांचे पक्ष घराणेशाहीचा वारसा निर्माण करणारे पाटलांचे पक्ष आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील ओबीसी समाजाने जागे होऊन उद्याच्या निवडणुकीत शंभर आमदार निवडून येतील याकडे लक्ष द्यावे ,असे आवाहनही त्यांनी केले . व्यासपीठावर वंचितचे विष्णु देवकते, युवा नेते पप्पू गायकवाड, राजु पोकळे, किशोर भोले, रेवन गायकवाड, ज्ञानेश्वर हवाले, मुबारक शेख, रामदास मोरे, सचिन कांडेकर, श्रीकृष्ण खेडकर, अनिल बोराडे, भारतिय बौध्द महासभा, समता सैनिक दल, वंचित बहुजन युवक आघाडी, सम्यक विद्यार्थी अ आंदोलन, माथाडी कामगार, डॉक्टर, वकिल, शिक्षक, पेन्शनधारी असोशियशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

आरक्षण बचाव यात्रेच्या सभेत बोलताना ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण वाद, शरद पवार, भाजपा आणि उद्धव ठाकरे, फडणवीस यांच्या भूमिकेवर सडकून टिका केली. ते म्हणाले की, ओबीसीची ताकद दिसत नाही. ओबीसीच्या माध्यमातून माळी, धनगर, वंजारी समाजाचा मेळावा नेते घेतात. परंतु , ओबीसीची राजकीय ताकत कुठे दिसते. समाजाची ताकद गर्दी करते पण ओबीसीच्या माध्यमातून राजकीय ताकत का दिसत नाही ? असा रोकडा सवाल त्यांनी करून येणारी विधानसभा ओबीसी - मराठा आरक्षणवादावर करून शरद पवार, उद्धव ठाकरे आणि भाजपाला पोळी भाजून घ्यायची आहे. मणिपूरचा विषय आताचा कसा आला. शरद पवारांनाच महाराष्ट्रात दंगली घडवायच्या आहेत का ? असा सवाल ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी यावेळी बोलताना केला. ओबीसी समाजाने ताकद दाखवून द्यायची वेळ, ओबीसीतून कोणी ही उमेदवार, त्यालाच माझे मत, तरच क्रांती होईल, १०० आमदार ओबीसीतून आले पाहिजेत .१७२ घराणी महाराष्ट्रात राज्य करतात. आई-वडील, भाऊ, चुलता, मालता, चुलती, पोरगा, पोरगी, नाहीच कुणी तेव्हा जवळचे आप्तेष्ट, यातूनच आमदार, खासदार, मंत्री संत्री झालेत. असा दाखला देत मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे-पाटील यांनी २८८ विधानसभेत उमेदवार उभे करून लढाई लढावी,गोरगरीब मराठा समाजातील आमदार करावेत, असे आवाहन ही ड. आंबेडकर यांनी करून प्रस्थापित मराठे त्यावेळी कसे उघडे पडतील हे अगदी स्पष्ट दिसून येईल असे निरिक्षणही त्यांनी नोंदविले.शरद पवारांना ओबीसी आरक्षण संपवायचे आहे. त्यांचा हा डाव या निवडणुकीत उधळून लावा. रात्र वैऱ्याची आहे.

# रोजगार हमी योजनेच्या कामांची बीडीओ कांबळेंकडून पाहणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यात मनरेगा अंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे झाली असून त्या कामाची गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती एम.एस.कांबळे यांच्या कडून सध्या पाहणी होत आहे. दरम्यान बुधवार दि.३१ जुलै रोजी ग्रामपंचायत तांदळा येथील मनरेगा अंतर्गत जलसिंचन विहीरीच्या कामाची गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे एम.एस.यांनी थेट प्रत्यक्षात पाहणी करुन ग्रामपंचायत कार्यालयात बसून लाभार्थ्यांच्या कुशल देयाकावर सह्या केल्या यामुळे लाभार्थ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सुरु असलेल्या तांदळा येथील जलसिंचन विहीरीच्या कामांची गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे एम.एस यांनी पाहणी करुन कामाची खात्री करत तांदळा ग्रामपंचायत कार्यालयात बसून लाभार्थ्यांच्या कुशल देयकावर सह्या केल्या तसेच मनरेगा अंतर्गत सुरु असलेल्या विविध कामांचा आढावा घेतला. यावेळी सरपंच सोनाली गवते, ग्रामसेवक अशोक बहिर , उपसरपंच मिरा सिरसट , तांत्रिक सहाय्यक इंजी.मंगेश लोणकर , रोजगार सेवक सोपान शेंबडे यांच्यासह लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.



गेवराई तालुक्यातील तांदळा येथे साधला ग्रामस्थांशी संवाद




आज विवेकानंद विद्यालय पिंपळगाव(गाढे) येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली या निमित्ताने विद्यालयांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी एक संकल्प केला की प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक झाड लावून ते व्यवस्थितपणे वाढविण्याचे व त्याची जोपासना करून वाढविण्याची जबाबदारी घेतली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सोनवणे सर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. छत्रभुज आण्णा नवले विद्यालयातील शिक्षक श्री.स्वामी सर श्री उपाडे सर श्रीमती काजळे मॅडम,श्री राहुल राडकर सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपाडे सर यांनी तर आभार प्रदर्शन काजळे मॅडम यांनी केले.



बीड नगर परिषद बांधकाम अभियंता अखिल फारोकी साहेब यांचा चिरंजीव सोनु राजे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सलीम अध्यक्ष नाजू बागवान



माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर वसाहत येथील जिल्हा परिषद शाळेत दि. ०१ ऑगस्ट वार गुरुवार रोजी सकाळी १०:३० वा. साहित्यरत्न डॉ .अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सरपंच संजयभाऊ नरवडे,शाळेचे मुख्याध्यापक गणेश नवले सर, , ग्रा.पं. सदस्य दत्ताभाऊ लोखंडे, ग्रा.पं. सदस्य दादासाहेब ढगे, अजित लोखंडे यांनी प्रतिमेचे पूजन करून केली. प्रसंगी गावातील शिक्षणप्रेमी नागरिक वसंत लोखंडे यांच्या मुलगा वंशवीर याच्या वाढदिवसा निमित्त शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, शालेय समिती अध्यक्ष अशोक थोरात यांनी अण्णाभाऊ साठे यांचे समाजकार्य व जीवन चरित्र विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन घनश्याम पांचाळ यांनी केले. तर आभारप्रदर्शन बालासाहेब बचाटे यांनी केले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित जाधव सर, धिरडे दादा, संजू नाना लोखंडे भारत नाईकनवरे, स्वयंसेवक बालासाहेब तौर, राजेभाऊ थोरात, महादेव लोखंडे, गोरख लोखंडे,कृष्णा लोखंडे , विशाल थोरात व गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात १ कोटी ६५ लाख ७० हजार ४३७ पीकविमा अर्ज दाखल, लाखो शेतकऱ्यांनी एक रुपयात भरला आपला पीकविमा - धनंजय मुंडे

## १५ जुलैला मुदतवाढ दिल्यानंतर २१ लाख ९० हजार अर्जांची वाढ! पीक विम्यापोटी राज्य शासन भरणार ४७२५ कोटींचा हिस्सा

**मुंबई (प्रतिनिधी)**


**खरीप हंगाम २०२४ साठी प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत आपल्या पिकांचा विमा भरण्याची अंतिम मुदत बुधवार ३१ जुलै रोजी संपुष्टात आली असून ३१ जुलै अखेर राज्यातुन १ कोटी ६५ लाख ७० हजार ४३७ पीकविमा अर्ज पीकविमा पोर्टलवर दाखल झाले असून याव्दारे लाखो शेतकऱ्यांनी आपले पीक केवळ १ रुपया विमा हफ्ता भरून आपले पीक विमा संरक्षित केले असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.**

प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत पीकविमा पोर्टलच्या वतीने सुरुवातीला १५ जुलै ही अंतिम मुदत देण्यात आली होती, मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे बरेच शेतकरी तेव्हा विमा भरण्यापासून वंचित राहिल्याने कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना विनंती करून ३१ जुलै पर्यंत मुदतवाढ करून घेतली होती. १५ जुलै नंतर अखेरपर्यंत २१ लाख ९० हजार अर्जांची त्यामुळे वाढ झाली आहे.दरम्यान राज्यात एकूण ९७% पेरणी पूर्ण झाली असून पीकविमा योजनेच्या माध्यमातून एकूण १ कोटी १० लाख ५५ हजार हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित करण्यात आले आहे. तर एकूण विमा संरक्षित रक्कम ही ५३ हजार ८८६ कोटी इतकी आहे.

एकूण विमा हफ्ता हा सुमारे ७९५९ कोटी इतका निश्चित असून, त्यापैकी शेतकरी हिस्सा एक रुपया प्रमाणे १ कोटी ६५ लाख, राज्य हिस्सा एकूण ४७२५ कोटी, त्यामध्ये राज्य शासनाचा स्वतःचा हिस्सा ३२३२ कोटी व शेतकऱ्यांच्या वतीने राज्य शासनाने भरावयाचा हिस्सा १४९२ कोटी इतका निश्चित करण्यात आला असून केंद्र सरकारचा हिस्सा ३२३३ कोटी इतका निश्चित करण्यात आला आहे.दरम्यान मागील वर्षीच्या खरीप हंगामामध्ये सुमारे १ कोटी ७१ लाख विमा अर्ज दाखल झाले होते तर संपूर्ण हंगामात वेगवेगळ्या प्रकारचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विम्या पोटी आतापर्यंत ७२८० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी ४२७१ कोटी पिक विम्याचे वाटप पूर्ण झाले असून आणखी ३००९ कोटी रुपयांचे



वितरण सध्या सुरू असून अंतिम पीक कापणी अहवालाचे काम १००% पूर्ण झाल्यानंतर या रकमेत आणखी वाढ होणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.






## डॉ.वसंतराव देशपांडे स्मृतीदिनी बरसल्या सुरांच्या धारा

अंबाजोगाई (प्रतिनिधी )

संगीताच्या बागेतील ब्रम्हकमळ संगीतसूर्य स्व.डॉ.वसंतराव देशपांडे यांच्या पुण्यस्मृतीदिनी ३१ जुलै रोजी रात्री आयोजित छोटेखानी संगीत सभेत सुरांच्या धारा बरसल्या संगीत सभेची सुरुवात अभियंता आनंद अरूणराव जोशी यांनी केली नंतर बी.के.पांडे,डॉ.अतुल कुंबेफळकर,सुचिता देशपांडे,युगंधरा जोशी, राजदिप जोशी आदींनी गायनाचे सादरीकरण केले. हार्मोनिअमवर बी.के.पांडे यांनी तर तबल्यावर रत्नदीप शिगे यांनी साथसंगत केली प्रारंभी प्रा.अविनाश जोशी यांनी प्रास्ताविकात स्मृती सामितीच्या उपक्रमाची माहिती दिली. उपस्थितांचे आभार अजय जोशी यांनी मानले. यावेळी श्रीमती आरती जोशी,अपर्णा जोशी, वैष्णवी जोशी,पत्रकार राहूल देशपांडे,सुमित केजकर आदी उपस्थित होते.



साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०४ जयंतीनिमित्त घाटा पिंपरी येथील ग्रामपंचायत मध्ये हा जयंती उत्सव साजरा करण्यात आला यावेळी सरपंच प्रल्हाद मुळीक व उपसरपंच शाहू झांजे पत्रकार सुरेश कांबळे माजी उपसरपंच छगन तळेकर सदाशिव घुमरे, ग्रामपंचायत सदस्य रवी बायकर सह मान्यवर उपस्थित होते छायाचित्र सुरेश कांबळे

# राज्याचे पुरवठा मंत्री ना. छगनराव भुजबळ आणि उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडवणीस यांच्या उपस्थितीत रविवारी अरण येथे संत सावता महाराज भक्त परिवार मेळावा

### बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील भाविक भक्त आणि समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - अ‍ॅड. सुभाष राऊत

बीड (प्रतिनिधी)

अरण, ता. माढा, जि. सोलापूर येथील श्री संत शिरोमणी सावता महाराज समाधी मंदिर येथे रविवार दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १२ : ३० वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडवणीस, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगनराव भुजबळ आणि गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री ना. अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भक्त परिवार मेळावा आणि भक्तनिवास वास्तुशिल्प भूमिपूजन सोहळा आयोजित केला असून याप्रसंगी बीड जिल्ह्यासह राज्यातील भाविक भक्त आणि समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

रविवारी संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास संत महंत आणि सावता महाराज यांचे वंशज उपस्थित राहणार असून याप्रसंगी ह. भ. प. केशव महाराज उखळीकर (अध्यक्ष जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदी), ह. भ. प. रखमाजी महाराज नवले (एकनाथ महाराज वारकरी संस्था पैठण), ह. भ. प. १००८ महामंडलेश्वर मनीषानंद महाराज पुरी (मानवत, जि. परभणी), ह. भ. प. महंत भक्तीदास महाराज शिंदे (श्री तुकाराम महाराज संस्थान बेलखंडी, जि. बीड) यांचे शुभाशीर्वाद लाभणार आहेत. तसेच याप्रसंगी शिरूर लोकसभेचे खा. डॉ. अमोल कोल्हे, नाशिक लोकसभेचे माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, विधान परिषदेचे सदस्य आ. योगेश टिळेकर, मान खटाव साताराचे आ. जयकुमार गोरे,



## बीड जिल्ह्यातून पाच हजार बांधवांची राहणार उपस्थिती

रविवार दि. ४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या श्री संत सावता माळी महाराज भक्त परिवार मेळावा आणि भक्तनिवास वास्तुशिल्प भूमिपूजन सोहळ्यासाठी बीड जिल्ह्यातून पाच हजार भाविक भक्त आणि समाज बांधव उपस्थित राहणार असल्याची माहिती समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ड. सुभाष राऊत यांनी दिली आहे.

विधान परिषदेचे आ. राम शिंदे, नाशिक मध्यच्या आ. फरांदे, विधान परिषदेच्या आ. प्रज्ञाताई सातव, महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. रूपालीताई चाकणकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

तरी बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील संत सावता माळी भक्त परिवार आणि समाज बांधवांनी मोठ्या संख्येने या नेत्रदीपक सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन ड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

## धानोरा रोड भागातील नगर सेवकांना रोडच्या आंदोलनात ओरडण्याचा नैतिक अधिकार नाही - संभाजी सुर्वे

बीड (प्रतिनिधी)

गेली अनेक वर्ष झाले शहरातील धानोरा रोड रस्त्यासाठी या भागातील नागरीक संघर्ष करत आहेत. या रस्त्यासाठी भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे यांनी पहिले अमरण उपोषण सुरू केले होते. त्यांच्या आंदोलनाच्या दणक्याने त्यावेळी या रस्त्याचे काम देखील चालु झाले होते. परंतु या वेळी या भागातील असणाऱ्या नगर सेवकांनी सुर्वे यांच्या आंदोलनाला कडाडून विरोध केला होता या मध्ये नगर सेवक भैय्या मोरे, रणजीत बनसोडे व शिवसेनेचे रतन गुजर हे या मध्ये आघाडीवर होते. तशा प्रकारचे प्रसिद्धी पत्रके देखील निघाली होती. हे सर्व पाहता या धानोरा रोड साठी सध्या या भागातील नितेश उपाध्य यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण चालु केले आहे. परंतु येणाऱ्या निवडणुकीच्या अनुसंगाने याचा फायदा आपल्याला व्हावा या उद्देशाने या



भागातील मागील पाच वर्षे फेल राहिलेले माजी नगर सेवक पोट तिडकडीने या आंदोलनात आरडाओरड करत आहेत तो त्यांना नैतिक अधिकार नाही असे मत भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे यांनी व्यक्त केले आहे.

तरी आमरण उपोषण करत असलेले नितेश उपाध्य यांच्या उपोषणाची जिल्हा प्रशासनाने दखल घेऊन रस्त्याचा विषय तातडीने मार्गी लावावा नसता आणखी तीव्र प्रकारचे आंदोलन करण्यात येईल असे आव्हान या वेळी भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे यांनी केले आहे.



## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती (लहुजी नगर )नाळवंडी येते उत्साहात साजरी

नाळवंडी (प्रतिनिधी)

बिड तालुक्यातील नाळवंडी मधील लहुजी नगर येथे साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या जयंतीच्या निमित्ताने अण्णाभाऊ साठे यांचे विचार,साहित्य तळागाळात पोहचले पाहिजे या साठी प्रयत्न केले पाहिजे,अण्णाभाऊ साठे यांची संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपली महत्वाची भूमिका बजावून परिवर्तनाला दिशा व चालना देण्याचं काम केले आहे,आज संपूर्ण देशात अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा केली जाते,त्याच प्रमाणे नाळवंडी येते अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरा करण्यात आली,या वेळी उपस्थित उपसरपंच बंडू म्हेत्रे,युवक नेता मसु जाधव,युवापत्रकार अमोल जाधव,मधुकर मिसाळ,भागवत कानडे,बळी कानडे,कैलास म्हेत्रे,सचिन कानडे,विकास कानडे,गणेश कानडे,अनिल लांडगे,अजय कानडे,रोशन कानडे,अशोक कानडे,अभिषेक कानडे,प्रेम कानडे,महादेव कानडे,अक्षय दूनघव,ओम दूनघव,सागर कानडे आदी




आपले विचार कार्य व प्रतिमा यातून लोक कलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आणि वंचितांच्या व्यथा प्रभावपणे मांडणारे साहित्य सम्राट लोक शाहीर डॉक्टर अण्णा भाऊ साठे जयंती दिनी शिरसमार्ग येथे साजरी करण्यात आली विनम्र अभिवादन करण्यात आली पांडुरंग तात्या कोळेकर, बडी काका कोळेकर, सुधाकर उमाप, दिनकर उमाप,संजय उमाप,दादा उमाप,भगवान उमाप ,राजेश उमाप,विजय उमाप ,पिनू ढवळे,मच्छिंद्र उमाप ,पवन उमाप,गणेश भिसे ,बालू पवार,अमर उमाप, आदेश उमाप,गुलाब मगर,संतोष पाबळे,संजय परदेशी,ऋषी परदेशी,अशोक कोळेकर,धीरज मेंडके,रघु साठे: अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती, शिरसमार्ग व वारणेचा वाघ प्रतिष्ठान, शिरसमार्ग

## विध्यार्त्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून

# डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती डी.पी.आय.पक्षाकडून रुई येथे साजरी

सिरसदेवी (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील रुई येथे आज दि.१/०८/२०२४ रोजी साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती डीपीआय पक्षाचे युवक गेवराई तालुका अध्यक्ष साईनाथ अडागळे यांनी जिल्हा परिषद शाळा रुई येतील विधार्त्यांना शालेय साहित्य वाटप करून जयंती साजरी केली.पृथ्वी ही शेषनागाच्या शिरावर नसून कामगारांच्या तळहतावर वसलेली आहे परखड विचारधारा जोपासत संयुक्त महाराट्राच्या चळवळीतील अग्रेसर असणारे



कामगारांच्या व्यथा माजी मैना गावाकडं राहिली माज्या जीवाची होतीय कायली या डफावर थाप मारून जगासमोर मांडणारे जगभरात ज्यांच्या कादंबरी व लेखन साहित्याच्या माध्यमातून पोहोचलेले तसेच दीड दिवसाची शाळा शिकून आपली छाप व किमया गाजवणारे साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त रुई येतील जिल्हा परिषद शाळा येथे डीपीआय पक्षाचे साईनाथ अडागळे यांच्याकडून शाळेतील विध्यार्थीना शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक उपक्रम राबून मोठया उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक वाघमारे यांनी अडागळे यांचे कौतुक करत शिक्षणाचे महत्व जाणत कुठलाही गाजावाजा व बॅनरबाजी न करता इतर खर्च टाळून तो शैक्षणिक साहित्यासाठी वापर करत स्तुत्य सामाजिक उपक्रम साठे जयंती निमित्त आयोजित करून गरजू विधार्त्यांना शालेय साहित्य वाटप केल्याबद्दल साईनाथ अडागळे यांचे शिक्षक वर्गाने व मुख्याध्यापक यांनी आभार मानले.यावेळी उपस्थित उप सरपंच सचीन खरवडे.,किसन अडागळे,जंबर सेख,बाबासाहेब जगदाळे,दिपक अडागळे,रोहीत अडागळे,कुणाल चव्हाण,आर एन चव्हाण,निखील चव्हाण,निखील माळी शाळेतील शिक्षक, विध्यार्थी तसेच गावातील नागरिक, समाजबांधव आदी होते.



साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती शहरात विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. दरम्यान या कार्यक्रमा निमित्त सकाळी १०.०० वाजता बीड शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख मा अनिलदादा जगताप तथा शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिकांनी अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व उपस्थितांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

# बीडमध्ये पाणी पुरवठा योजनेसाठी अतिरिक्त विद्युत भार मंजूर करावा

## ना.अजित पवार, ना.धनंजय मुंडे यांच्याकडे डॉ.योगेश क्षीरसागर यांची आग्रही मागणी

बीड (प्रतिनिधी)

शहरातील पाणी पुरवठा योजनेसाठी अतिरिक्त विद्युत भार मंजूर करावा, हा बीड शहरवासियांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवावा, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे मुंबईत भेटून बुधवारी (दि.३१) केली आहे.अमृत अभियान अंतर्गत पाणी बीड पाणी पुरवठा योजनेचे काम अंतिम टप्यात आहे. या योजनेसाठी अतिरिक्त विद्युत भार मंजूर करावा, अशी मागणी सातत्याने लावून धरली आहे. यापूर्वी आपण परळीत शासन आपल्या दारी कार्यक्रमात उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडवणीस, ना.अजित पवार यांना भेटून हा प्रश्न मांडला होता. त्यानंतर बीड शहर हे दुष्काळग्रस्त भागात येत आहे. सुमारे



४० ते ५० किमी लांबीवरुन पंपिंगद्वारे शहरास पाणी पुरवठा करावा लागत आहे. शहरास वेळेवर पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणे गरजेचे आहे. नगरपरिषदेमार्फत वेळोवेळी चालू वीज देयके अदा केलेली आहेत. त्यामुळे अहमदनगर महानगरपालिकेच्या धर्तीवर अतिरिक्त वीज भार मंजूर करण्यासाठी आदेशित करण्यात यावेत, अशी मागणी वेळोवेळी केलेली आहे. यासंदर्भातील निवेदने, पत्रव्यवहार ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांच्यासमोर मुंबईत भेटून ठेवला. दोघांनी हा प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यात येईल अशी ग्वाही दिली आहे.

ना.धनंजय मुंडे यांच्या प्रकृतीची चौकशी; इद्रिस इलियास यांची भेट

ना.धनंजय मुंडे यांच्यावर दोन दिवसापूर्वी पित्ताशयाच्या शस्त्रक्रियेवर यशस्वी उपचार करण्यात आले होते. डॉक्टरांनी त्यांना चार दिवस विश्रांतीचा सल्ला दिला आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बुधवारी धनंजय मुंडे यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. दरम्यान, आजारी असताना देखील मुंडे यांनी बीडच्या विकास प्रश्नी चर्चा केली.ना.अजितदादांनी उड्डाणपूल, स्लीप रोड प्रश्नाकडे लक्ष घालावे-डॉ.योगेश क्षीरसागर

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगतच्या स्लीप रोडसह महालक्ष्मी चौकात उड्डाणपुल बांधण्यासंदर्भातील तांत्रिक शक्यता तपासण्याचे निर्देश केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने दिले आहेत. याबाबत आपण दिलेल्या प्रस्तावाचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाच्या तांत्रिक सल्लागारांनी महामार्ग प्राधिकरणाच्या प्रादेशिक अधिकार्यांना हे निर्देश दिले आहेत. हा विषय गतीने मार्गी लागावा, यासाठी ना. अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांनी लक्ष घालावे, अशी मागणी देखील डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.



आज माजलगाव शहरातील अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक,डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक,शेलापुरी,या विविध ठिकाणी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना माजी सभापती नितीनदादा नाईकनवरे यावेळी उपस्थित सर्व समाज बांधव




# अनिलदादा जगताप यांच्या वतीने गायरानधारक शेतकऱ्यांना फवारणी पंपाचे वाटप

बीड (प्रतिनिधी)

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीडमध्ये साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे समन्वयक अजिंक्य चांदणे, उत्सव समिती अध्यक्ष सुशिलाताई मोराळे असून अवघ्या महाराष्ट्र राज्याला आदर्श निर्माण करून देईल, असा महोत्सव विविध उपक्रमातून साजरा केला जात आहे. काल मंगळवार ३० जुलै रोजी बीड शहरासह जिल्हाभरातील गायरानधारक शेतकऱ्यांना बीड शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने फवारणी पंपाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी अनिलदादा जगताप तथा सचिनभैय्या मुळूक यांनी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. याबरोबरच अनिलदादा जगताप तथा सचिनभैय्या मुळूक यांनी उपस्थित गायरानधारक शेतकऱ्यांशी मुक्तसंवाद साधला, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. लवकरच आम्ही महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष तथा लाडके मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब यांची भेट घेऊन गायरानधारक शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत चर्चा करणार आहोत. त्यांना याबाबत निवेदन देखील देण्यात येणार असल्याचे उपस्थित शेतकरी बांधवांना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप तथा सचिनभैय्या मुळूक यांनी आश्वासन दिले. दरम्यान किशोर जगताप माजी जिल्हा परिषद सदस्य, गायरानधारक शेतकरी, महिला आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# बीड शहराजवळील स्लीप रोडसह उड्डाणपुलाचा प्रश्न मार्गी लागणार

## डॉ.योगेश क्षीरसागरांनी उपमुख्यमंत्र्यांसह बीडच्या पालकमंत्र्यांकडे लावून धरला प्रश्न

बीड (प्रतिनिधी)

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगतच्या स्लीप रोडसह महालक्ष्मी चौकात उड्डाणपुल बांधण्यासंदर्भातील तांत्रिक शक्यता तपासण्याचे निर्देश केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रस्तावाचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाच्या तांत्रिक सल्लागारांनी महामार्ग प्राधिकरणाच्या प्रादेशिक अधिकार्यांना हे निर्देश दिले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसात हा विषय मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या बीडच्या वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपुल तयार केला तर हे अपघात टाळता येतील असे सांगत




डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाकडे प्रस्ताव दिला होता. यात महालक्ष्मी चौकातील उड्डाणपुलासोबतच तेलगाव आणि पिंपळनेर रस्त्यावरील स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती. या पत्रांचा संदर्भ देत आता भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाचे तांत्रिक सल्लागार बाळासाहेब ठेंग यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नागपूर येथील प्रादेशिक अधिकार्यांना पत्र लिहिले आहे. यात उड्डाणपुल आणि स्लिप रोड संदर्भातील तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, हा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सतत लावून धरला. अलीकडे लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान माजलगाव येथे जाहीर सभेत हा प्रश्न मार्गी लावण्याची घोषणा ना.नितीन गडकरी यांनी केली होती. त्यानुसार विभागाकडून पाऊले उचलली जात आहेत.

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या आदेशावरून तांत्रिक शक्यता तपासण्याचे निर्देश**

### ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडेंसह आ.पंकजाताई मुंडेंच्या शिफारशीमुळे यश

परळी येथे शासन आपल्या दारी कार्यक्रमात आलेले उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे बीड शहराजवळील उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली होती. त्या मागणीच्या अनुषंगाने दोघांनीही रस्ते, वाहतूक व दळणवळण विभागाकडे शिफारस केली होती. तसेच, आ.पंकजाताई मुंडे यांनी हा प्रलंबित प्रश्न ना.नितीन गडकरींच्या कानावर घातला होता. दरम्यान, उड्डाणपूल, स्लिप रोडसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळत आहे.

# कंत्राटदार अधिकाऱ्याच्या संगनमताने भोगलवाडी रस्त्याचे निकृष्ट काम



धारूर (प्रतिनिधी)

धारुर तालुक्यातुन खामगाव पंढरपुर मार्गावरून भोगलवाडी फाटा ते भोगलवाडी रस्त्याचे काम करण्यात येत आहे हे काम सार्वजनिक बांधकाम विभाग धारुर अंतर्गत करण्यात येत असून या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले जात आहे. अंदाज पत्रकाला फाटा देत अधिकाऱ्यांशी संगनमत करून

पहिल्याच रस्त्यावरती न उकरता खडी टाकून काम करत आहेत रस्त्याचे निकृष्ट (बोगस) काम करत असतांना अधिकाऱ्यांच्या संगनमत असल्याचे त्यावरून दिसून येत आहेत रस्त्याच्या बाजूने फक्त चुनखडमाती मिश्रित मुरूम टाकून रस्त्याच्या बाजूने काम चालू आहे त्यांची मटरेल अंदाज पत्रका पेक्षा कमी करत आहेत या अगोदरील जुन्या रस्त्यावर बोगस रास्ता बनवून आपला हेतु साध्य करत शासनाचे पैसे उखळण्याचा डाव साधत संबंधित कंत्राटदारा मार्फत केला जात असल्याची तक्रार गावातील नागरिक करीत आहेत. रुंदीकरण, खोलीकरण, व अंदाजपत्रकानुसार सांगितल्या प्रमाणे दगड, मुरूम व पाणी टाकून डोजरच्या साहाय्याने दबाई करण्याच्या कामात सुद्धा सदरील कंत्राटदार हे दिरंगाई करतांना दिसत आहे, रुंदीकरण करतांना दोन्ही बाजूनी रस्त्यात बाजूचीच माती खोदून टाकली जात आहे.

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला तक्रारी प्राप्त झाल्या आहेत,तरी देखील या कामांमध्ये निकृष्ट कामाचा धडाका चालूच आहे. सदरील रास्ता हा गावातील दळणवळणाचा मुख्य रास्ता असून या कामासाठी निधी हा माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या प्रयत्नातून आलं असून त्यामुळे आमदार यांनी स्वतः याकळे लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांमध्ये सांगण्यात येत आहे त्याव्यतिरिक्त या रस्त्याच्या कामात तालुका सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे. बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बीड जिल्हाधिकारी श्री.पाठक साहेबांनीही याकडे लक्ष देण्याची मागणी भोगलवाडी ग्रामस्थातुन केली जात आहे.



# सिरसदेवीत लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती उत्साहात साजरी

सिरसदेवी (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे लोकशाहीर साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती विविध ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली.दि.१/८/२०२४ रोजी जगविख्यात साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती निमित्त सिरसदेवी येथील समाज बांधव व सामाजिक कार्यकर्ते नेतेमंडळी तसेच,मा.सरपंच रवींद्र गाडे, पंचायत समिती सदस्य जगन अडागळे,उपसरपंच पवार,ग्रामपंचायत सदस्य सोसायटी सदस्य, तसेच सर्व सहकारी मित्र तसेच समस्त गावकरी मंडळी यांच्या उपस्थिती मध्ये सरपंच गाडे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेंच सर्व समाज बांधवानी मिळून साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा जयघोष करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

डॉ.अण्णाभाऊ साठे यांनी शोषण, अन्याय, अत्याचाराला विरोध करणे हेच ध्येय त्यांनी मानले व मानवी वृत्ती, प्रवृत्तीचे वास्तव दर्शन वाचकांना घडविले. अण्णाभाऊंनी आपल्या शब्दांना अंगाराचे रूप देऊन दलितांच्या श्रमिकांच्या निर्जीव मनाला कायम चेतवत ठेवले. अशा महान महामानवाची १०४ वी जयंती सिरसदेवी येथील ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळा,आदर्श वाचनालय, वीर लहुजी नगर या सर्व ठिकाणी गावातील समस्त नागरिकांनी, युवकांनी, समाज बांधवानी उपस्थित राहुन साठे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी गावचे सरपंच रवींद्र गाडे, ग्रामपंचायत सदस्य राहुल अडागळे, पंचायत समिती सदस्य जगन अडागळे, पत्रकार शाम अडागळे, रामभाऊ अडागळे, दामू अण्णा मोरे,जगदीश वेताळ,दत्ता वेताळ, लखन अडागळे,शरद अडागळे, बाळू अडागळे, शंकर अडागळे, तसेंच जयंती उत्सव समिती, समाज बांधव, गावातील नागरिक आदी उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT